CIDCO
WE MAKE CITIES

प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

सिडको
शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;

For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. १९-११-२०२१**

## सिडकोकडून नैना प्रकल्पाच्या जलद विकासासाठी तसेच व्यवसाय सुलभतेसाठी युडीसीपीआरमधील मार्गदर्शक तरतूदींचा समावेश करण्यात येणार
## या संदर्भातील जनतेच्या सूचना व हरकती मागविण्यासाठीची सूचना प्रसिद्ध

सिडको महामंळाकडून विकसित करण्यात येत असलेल्या नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) प्रकल्पाच्या जलद विकासासाठी तसेच नजीकच्या काळात उदयास येणाऱ्या नैना प्रदेशात व्यवसाय सुलभतेसाठी (इज ऑफ डुइंग बिझनेस) राज्य शासनाच्या एकात्मिक नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील (युडीसीपीआर) काही मार्गदर्शक तरतूदींचा अंगीकार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे नैना प्रकल्पासह एकात्मिक नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील सर्वोत्कृष्ट तरतूदींची अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे व या माध्यमातून अधिक व्यवहार्य प्रकल्प मार्गी लागतील व सर्वांगीण विकासास मदत होईल. तसेच दिनांक ३ नोव्हेंबर २०२१ रोजी महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत राजपत्रात महाराष्ट्र प्रादेशिक प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम च्या कलम ३७, उपकलम (१) अन्वये सर्वसाधारण जनतेच्या सूचना आणि हरकती मागवण्यासाठी सूचनाही प्रसिद्ध करण्यात आली आहे. या सूचनेवर सर्वसाधारण जनतेच्या सूचना आणि हरकतींवर सुनावणीसाठी मुख्य नियोजनकार (नैना), एसपी (डीपी नैना) आणि एसपी (बीपी नैना) यांची समिती स्थापन करण्यात आली आहे.

**"नैना हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असणार असून या शहरात व्यावसायिक आणि वाणिज्यिक उपक्रम मोठ्या प्रमाणावर उदयास येणार आहेत. सिडको महामंडळ नैना क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत आहे. युडीसीपीआरमधील काही विशिष्ट तरतुदींचा नैना प्रकल्पामध्ये समावेश करण्याचा निर्णय सिडको संचालक मंडळाकडून घेण्यात आला आहे व यामुळे व्यवसाय सुलभता प्रदान होईल."**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सिडकोकडून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळा भोवतालच्या प्रदेशात होणारी संभाव्य अनिर्बंध वाढ रोखण्यासाठी ठाणे आणि रायगड जिल्ह्यांतील ३७१ चौ.कि.मी. च्या प्रदेशावर नैना प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. पर्यावरणपूरक विकासावर आधारित, निवासी, वाणिज्यिक, शैक्षणिक इ. सोयी सुविधांनी परिपूर्ण

असे शहर विकसित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. नैना प्रकल्पाची अंमलबजावणी एकूण ११ नगर रचना परियोजनांच्या माध्यमातून करण्यात येत आहे. जमीन एकत्रीकरण प्रारुपावर हा प्रकल्प आधारित आहे. नैना अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने सदर प्रदेशात नियमावली लागू करण्याची जबाबदारी सिडकोवर आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी असलेली नैना प्रदेशाची संलग्नता लक्षात घेता जगाच्या नकाशावर नैना प्रदेशाला महत्वाचे स्थान प्राप्त होईल.

सिडकोकडून शहरांतर्गत वैद्यकीय सिटी, क्रीडा सिटी, शैक्षणिक सिटी, संशोधन व विकास क्षेत्र, पर्यावरणीय पर्यटन, मनोरंजन सिटी अशी समर्पित क्षेत्रे विकसित करण्यात येणार आहेत. यामुळे हे शहर आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय गुंतवणूकदारांच्या आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. संधानतेचा (कनेक्टिव्हिटी) विचार करता महामार्ग, उपनगरी रेल्वे, मेट्रो यांद्वारे नैना शहराला उत्तम संधानता लाभणार आहे. या सर्वांमुळे नैना प्रदेशात उद्योग, व्यवसाय आणि वाणिज्यिक उपक्रम मोठ्या प्रमाणावर विकसित होणार आहेत. या पार्श्वभूमीवर नैना प्रदेशातील भावी उद्योजकांना व्यवसाय सुलभतेचा लाभ व्हावा यासाठी युडीसीपीआरमधील विशिष्ट तरतुदींचा नैना प्रकल्पामध्ये समावेश करण्याचा निर्णय सिडकोकडून घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे नैना प्रकल्पाच्या जलद अंमलबजावणीसही मदत होणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

जनसंपर्क विभाग, सिडको